# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# पुणे वृत्तांत
# वेळ - संध्याकाळी 06.00 वा.

**दिनांक- 04.04.2025** **वार-शुक्रवार**

---

**मंगेशकर रुग्णालय**

पुण्यात दीनानाथ मंगेशकर रुग्णालयात वेळेवर उपचार न मिळाल्याने गर्भवती महिलेचा मृत्यू झाल्या प्रकरणाची मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी गंभीर दखल घेतली आहे. या घटनेची चौकशी करण्यासाठी धर्मादाय सह आयुक्तांच्या अध्यक्षतेखाली चौकशी समिती नेमण्याचे आदेश त्यांनी दिले आहेत. या प्रकरणाची सखोल चौकशी तज्ज्ञ डॉक्टरांच्या समितीद्वारे करण्याचे आदेश उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी दिले आहेत. सर्व नागरिकांनी संयम बाळगावा आणि प्रशासनास सहकार्य करावे, असे आवाहन पवार यांनी केलं आहे.

**महसूल विभाग**

महसूल विभाग हा शासनाचा चेहरा असून पारदर्शक आणि गतिमान कामकाजासोबतच नवतंत्रज्ञानाचा वापर करून, महसूल विभाग अधिक सक्षम करण्यासाठी सर्वांनी प्रयत्न करणे आवश्यक असल्याचं प्रतिपादन राज्याचे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी केलं. महसूल क्षेत्रिय अधिकाऱ्यांच्या दोन दिवसीय कार्यशाळेच्या उद्घाटन प्रसंगी ते बोलत होते. मुख्यमंत्र्यांनी महसूल विभागाच्या शंभर दिवस कृती कार्यक्रमाच्या अनुषंगाने दिलेल्या निर्देशानुसार येथील हॉटेल ऑर्चिड येथे दोन दिवसांच्या कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे.

**बीसी टू एडी**

आज भारतात प्रत्येक क्षेत्रात आर्टिफिशीयल इंटेलिजन्स वापराचे प्रमाण वाढत आहे. या क्षेत्रात देशाने उशिराने सुरवात केली असली तरी, नजीकच्या भविष्यात आपला देश त्यामध्ये मोठी प्रगती करेल, असा विश्वास राज्याचे राज्याचे उच्च आणि तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांनी व्यक्त केला. महाराष्ट्रीय मंडळाचे चंद्रशेखर आगाशे शारीरिक शिक्षण महाविद्यालय आणि आबासाहेब गरवारे कॉलेज ऑफ कॉमर्स यांनी संयुक्तपणे आयोजित केलेल्या बीसी टू एडी अर्थात बिफोर चॅटजीपीटी टू एआय डिसरप्शन या दोन दिवसीय आंतरराष्ट्रीय परिषदेचं उद्घाटन पाटील यांच्या हस्ते आज झालं. त्यावेळी ते बोलत होते.

**एआय**

कृत्रिम बुद्धिमत्तेच्या वापरापूर्वी योग्य आणि विश्वासार्ह माहितीचे संकलन होणे आवश्यक असते. नगर रचना आणि मूल्यांकन विभागात कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर करताना विभागाच्या आवश्यकतेनुसार परिणाम साधण्यासाठी सुयोग्य प्रॉम्पटस् वापरणे तसेच शासकीय कामकाजात कृत्रिम बुद्धिमत्तेविषयी स्वतंत्र विभाग विकसित करणे आवश्यक आहे, असं मत ज्येष्ठ संगणकतज्ज्ञ आणि माहिती तंत्रज्ञान क्षेत्रातील अग्रणी डॉक्टर दीपक शिकारपूर यांनी केले. नगर रचना आणि मूल्यांकन विभागाच्या अधिकाऱ्यांसाठी शहर नियोजनात कृत्रिम बुद्धिमत्तेचे स्थान या विषयी जिल्हाधिकारी कार्यालयातील नगर रचना विभागात मार्गदर्शन सत्राचे आयोजन करण्यात आले होते, त्यावेळी शिकारपूर बोलत होते.

**यशस्वी परिषद**

विद्यार्थ्यांनी क्रमिक अभ्यासक्रम आणि कौशल्य आत्मसात करत असतानाच व्यक्तिमत्वातील स्व-संशोधनावर भर द्यायला हवा असं आवाहन अमेरिकेतील इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट अकाउंट्सचे प्रमुख सुनील देशमुख यांनी केलं. ते आज यशस्वी एज्युकेशन सोसायटीच्या इंटरनॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट सायन्स यांच्यावतीनं आयोजित व्यवस्थापन आणि

माहिती तंत्रज्ञानातील नवोपक्रम या मध्यवर्ती संकल्पनेवरील पाचव्या आंतरराष्ट्रीय परिषदेचे उद्घाटन करताना बोलत होते. याप्रसंगी 'यशोमंथन' या शोधनिबंध पुस्तिकेचे प्रकाशन सर्व मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.

**तक्रार निवारण कक्ष**

पुणे महापालिकेत नागरिकांसाठी स्थापन केलेला तक्रार निवारण कक्ष काल कार्यान्वित करण्यात आला. पहिल्याच दिवशी अतिरिक्त आयुक्त एम. जे. प्रदीप चंद्रन यांनी नागरिकांच्या 45 तक्रारी ऐकून घेतल्या. त्यामध्ये सर्वाधिक तक्रारी या अनधिकृत बांधकाम, रस्त्यांची दुरवस्था, खड्डे, घनकचरा व्यवस्थापन आणि पाणीपुरवठ्याशी संबंधित होत्या. नागरिकांच्या तक्रारी थेट ऐकून घेण्यासाठी महापालिका आयुक्त कार्यालयाने हा कक्ष स्थापन केला आहे.

**कोंढवा कत्तलखाना**

कोंढवा येथील कत्तलखान्याच्या क्षमातेत वाढ करण्याबरोबरच कत्तलखान्यासाठी नवीन जागा शोधण्यात येईल असं पुणे महापालिकेच्या आरोग्य प्रमुख डॉक्टर नीना बोराडे यांनी सांगितलं. महाराष्ट्र राज्य प्रदूषण नियंत्रण मंडळाने कत्तलखाना परिसरात होत असलेल्या दुर्गंधीबद्दल महापालिकेला नोटीस दिली आहे या संदर्भात आरोग्य प्रमुख डॉक्टर बोराडे यांनी पत्रकार परिषदेत माहिती दिली.

**वाहनांचा लिलाव**

पुणे महापालिकेच्या वाहन विभागाकडील 15 वर्षांपेक्षा अधिक जुन्या झालेल्या 473 वाहनांचा लिलाव झाला असून त्यातून महापालिकेला 6 कोटी 91 लाख रुपये मिळाले असल्याची माहिती महापालिकेचे उपायुक्त जयंत भोसेकर यांनी दिली. केंद्र सरकारने दोन वर्षांपूर्वी आणलेल्या जुनी वाहने मोडीत टाकण्याच्या धोरणानुसार जुन्या वाहनांचा लिलाव करण्यात आल्याचं भोसेकर यांनी स्पष्ट केलं

**पीडीएफए लीग**

पुणे जिल्हा फुटबॉल संघटनेतर्फे 'पीडीएफए लीग 2025' फुटबॉल स्पर्धा सुरू आहेत. यामध्ये व्दितीय श्रेणी गटाच्या सामन्यात केशव माधव प्रतिष्ठान इलेव्हन, डेक्कन इलेव्हन, बोपोडी एलएफए एफसी आणि सिटी एफसी पुणे या संघांनी आपापल्या प्रतिस्पर्धी संघांचा पराभव करून विजयी कामगिरी केली.

**हवामान**

पुणे आणि परिसरात आज दुपारपासून ढगाळ वातावरण असून पावसाची शक्यता आहे. उद्याही दुपारनंतर आकाश अंशत: ढगाळ राहण्याचा अंदाज पुणे वेधशाळेनं वर्तवला आहे.

**हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू विविध भारती पुणे केंद्रावर, संध्याकाळी सहा वाजता, ताज्या पुणे वृत्तांतमध्ये, नमस्कार.**